ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष २७ | पुणे, बुधवार, १ डिसेंबर, १९७१ | अंक २१


## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड



स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स—कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चित वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड, साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

**ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.**




**TF ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
क्राऊन * हिन्दुस्थान युनिट नं. १ * हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.

### आर्थिक कार्यक्रमाच्या अमलबजावणीवर देखरेख

पंचवार्षिक कार्यक्रमातील योजनांची अमलबजावणी नीट होत नाही, अशी तक्रार ऐकू येते. ती लक्षात घेऊन नियोजन-समितीने अमलबजावणीच्या कामावर देखरेख करण्यासाठी एक स्थायी समिती नेमण्याचा विचार चालविला आहे. कार्यक्रमातील कामाची वाटचाल होत आहे की नाही, त्यात काही उणिवा दिसून येतात किंवा काय, ह्यावर समिती सारखी नजर ठेवील आणि चुका होत असल्यास त्या सुधारून घेण्यासाठी उपाय सुचवील. तथापि समितीचे काम देखरेख करण्याचेच राहील. त्यापुढे जाऊन स्वतःच्या अखत्यारात काही सुचविण्याचा अधिकार तिला असणार नाही. अशा प्रकारच्या एखाद्या यंत्रणेची अलीकडे फार गरज भासू लागली होती. कारण, औद्योगिक वाढीच्या वेगात बराच मंदपणा आलेला असून एकंदरीने अर्थ-व्यवस्था रुतून बसल्यासारखी दिसत आहे. खरे तर अलीकडे औद्योगिक आयातीबाबत उदार धोरण स्वीकारण्यात आले असून वित्तीय संस्थांकडून अधिक प्रमाणावर पैशाची मदतही देण्यात येत आहे आणि तरीही औद्योगिक विकासाचा वेग खूपच कमी झाला आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत औद्योगिक वाढीचा वेग १ टक्क्याच्या आसपास आहे. १९७० साली हाच वेग ४·५ टक्के व त्यामागील वर्षी ७·१ टक्के इतका होता. पंचवार्षिक कार्यक्रमात वाढीचा वेग ८ ते १० टक्के असेल असे गृहीत धरण्यात आलेले आहे. पण हे उद्दिष्ट गाठता येईल की नाही ह्याविषयी शंका वाटण्यासारखी परिस्थिती अलीकडे उत्पन्न झाली आहे.

### कार्यक्षमतेकडे लक्ष हवे

सार्वजनिक मालकीच्या विभागातील औद्योगिक संघटना कितपत कार्यक्षम आहेत ह्यासंबंधी संकल्पित स्थायी समिती विशेष लक्ष देणार आहे. कारण संघटित उद्योगधंद्यांत जे भांडवल गुंतविलेले आहे त्यापैकी जवळ जवळ निम्मे भांडवल सार्वजनिक मालकीच्या विभागात गुंतलेले आहे. अर्थातच त्या विभागाच्या कार्यक्षमतेकडे लक्ष पुरविणे अगत्याचे झाले आहे. १९७०–७१ साली ह्या विभागात ४ हजार कोटी रुपयांचे प्रचंड भांडवल गुंतलेले होते. इतक्या मोठ्या रकमेवर त्या वर्षी अवघा १·३ टक्के नफा झालेला आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागातील उद्योगधंद्यांनी इतर व्यापारी संघटनांप्रमाणे आपला धंदा वाजवी नफा मिळविण्यावर नजर देऊन चालविला पाहिजे असा आग्रह धरणे आता गैर मानले जात नाही. उद्योगधंद्यांची सर्व क्षमता वापरली जात नाही ह्याबद्दलही नियोजन समितीला चिंता वाटत आहे. यंत्रोद्योग व वाहतूक ह्या कारखान्यांची अलीकडे एक पाहणी करण्यात आली असता असे आढळून आले की पाहणीत समाविष्ट केलेल्या कारखान्यांपैकी ३८ कारखान्यांनी आपल्या क्षमतेपैकी ५० टक्क्यांपेक्षाही कमी क्षमता वापरली होती. नित्योपयोगी माल तयार करणाऱ्या ४६ कारखान्यांची पाहणी करण्यात आली असता फक्त ९ कारखाने ५० टक्क्यांच्या आसपास क्षमता वापरीत होते असे दिसले. खताचे कारखाने व रासायनिक कारखाने ह्यांचीही स्थिती अशीच आहे. अशा प्रकारचे एकूण ८१ कारखाने आहेत. पण त्यापैकी अवघ्या २७ कारखान्यांनी आपल्या क्षमतेपैकी ५० टक्क्यांच्या आसपास क्षमता उपयोगात आणली असे दिसून आले.

### "गुप्त रोगाच्या प्रतिबंधाला संततिप्रतिबंधाइतके अग्रस्थान आणि महत्त्व द्या"

ग्रेट ब्रिटनचे एक अग्रेसर गुप्त रोगतज्ज्ञ डॉ. क्लॉड स्काट निकोल ह्यांनी ब्रिटिश कौन्सिलच्या तर्फे भारतात एक व्याख्यानदौरा नुकताच पुरा केला. त्यांच्या अंदाजाप्रमाणे, भारतामध्ये २ कोटींपेक्षा जास्त लोक गुप्त रोगाने पछाडलेले असावेत. लैंगिक संबंधाच्या द्वारा पसरणाऱ्या ह्या रोगाला प्रतिबंध करणारी लस शोधून निघेपर्यंत ठिकठिकाणी त्यावर उपाययोजना करणारी पुष्कळ केंद्रे काढण्यात आली पाहिजेत. ग्रेट ब्रिटनमध्ये ५·५ कोटी नागरिकांसाठी अशी २०० केंद्रे आहेत; तामीळनाडूमध्ये ४ कोटी नागरिकांसाठी फक्त १८ केंद्रे आहेत. गुप्त रोगाच्या धोक्याबद्दल जनतेला जागृत करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य खात्यांनी देशव्यापी मोहीमच उघडली पाहिजे; त्याकरता तांबड्या त्रिकोणाप्रमाणे प्रतिकांचा, छोट्या चित्रपटांचा, व्यंग्यचित्रांचा उपयोग केला पाहिजे. अमेरिकेत सिफिलिस प्रतिबंधक लस शोधून काढण्यासाठी संशोधन चालू आहे. पाच वर्षांत अशी लस शास्त्रज्ञ तयार करू शकतील असा अंदाज आहे. ही लस सर्वांच्या बाबतीत प्रभावी ठरेल किंवा नाही हे सांगता येत नाही. वाढती सरमिसळ, व्यक्तिस्वातंत्र्याच्या भरमसाट कल्पना, संततिप्रतिबंधक गोळी, नीतिमत्तेचे अधःपतन आणि विवाहापूर्वीच लैंगिक सुखोपभोग, ह्यामुळे लैंगिक संबंधद्वारा रोगाचा फैलाव वाढला आहे. ग्रेट ब्रिटनमध्ये ४० वर्षांपूर्वी बहुतेक पुरुषांना वेश्यांचे द्वाराच गुप्त रोग व्हावयाचे; आता ९०% पुरुषांचा गुप्त रोग वेश्यांचे द्वारा झालेला नसतो! विद्यार्थ्यांमधील गुप्त रोगाचे प्रमाण वाढत चालले आहे. कंडोन्सच्या वापरामुळे सिफिलिसचा फैलाव होण्याची शक्यता आहे, ह्या समजुतीत तथ्यांश असल्याचे त्यांनी सांगितले. सिफिलिस झालेल्या १० पैकी एक जण मृत्यू पावण्याचा संभव असतो. गनोरियामुळे रोगी क्वचितच दगावतात. पण त्यांना शारीरिक दुःखे फार भोगावी लागतात. भारतातील वैद्यकीय कॉलेजातून (मद्रासमधील एक अपवाद वगळता) गुप्त रोग हा स्वतंत्र विषय म्हणून शिकविला जात नाही; त्वचा रोगाबरोबर तो शिकविला जातो आणि त्वचा रोगांनाच शिक्षक आणि विद्यार्थी महत्त्व देतात. इंग्लंडमध्ये परदेशांतून येऊन राहिलेल्यांत गुप्त रोग मोठ्या प्रमाणावर आढळतो. तेथे स्थायिक होऊ इच्छिणारा प्रत्येक पुरुष सहकुटुंब आला पाहिजे, असे ह्यापुढे धोरण ठेवले पाहिजे.

---

☆ अर्थ ☆

बुधवार, १ डिसेंबर, १९७१



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एवं प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## ठेवींचा पुरवठा आणि कर्जाची गरज ह्यांचा मेळः रिझर्व्ह बँकेचे धोरण

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. एस. जगन्नाथन् ह्यांनी प्रमुख बँकांचे चेअरमन, कस्टोडिअन आणि चीफ एक्झिक्युटिव्ह ह्यांच्या बैठकीत चालू तेजीच्या हंगामातील कर्जपुरवठ्याबाबत चर्चा केली. पैशाचा पुरवठा, वाढती महागाई, नुकत्याच संपलेल्या मंदीच्या हंगामातील ठेवींची प्रवृत्ती, ठेवींमधील आणि कर्ज-मागणीतील अपेक्षित वाढ, ह्या सर्वांचा त्या वेळी विचार झाला.

१९७१-७२ च्या तेजीच्या हंगामात शेड्यूल्ड व्यापारी बँकां-कडील ठेवींत ४७५ कोटी ते ५०० कोटी रुपयांची भर पडेल असा अंदाज आहे. पूर्वीच्या तेजीच्या हंगामात ठेवी ४३२ कोटी रुपयांनी आणि १९६९-७० च्या तेजीच्या हंगामात ३२१ कोटी रुपयांनी वाढल्या होत्या. चालू तेजीच्या हंगामात ४८० कोटी ते ५०० कोटी रुपयांनी कर्जपुरवठा वाढेल अशी अपेक्षा आहे. १९७०-७१ आणि १९६९-७० चे तत्सम आकडे अनुक्रमे ३९० कोटी रु. आणि ५६२ कोटी रु. असे आहेत.

बँकांकडील पैसा कर्जपुरवठ्याची गरज भागविण्यास पुरेसा पडेल, अशी सदिच्छा व्यक्त करण्यात आली. बँकांनी रिझर्व्ह बँकेकडून अगदी नाइलाज होईल तेव्हाच कर्ज घ्यावयाचे आहे, ह्याची बँकर्सनी जाणीव ठेवावयाची आहे. चलनवाढीचा ताण कमी करण्याचे रिझर्व्ह बँकेचे सामर्थ्य मर्यादित आहे, हे श्री. जगन्नाथन् ह्यांनी स्पष्ट केले. बिगर-बँकिंग कंपन्या घेत असलेल्या ठेवींवर नियंत्रण ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँक योजना तयार करीत आहे. बँकिंग कमिशनचा अहवाल तयार होण्याची त्यासाठी वाट पाहिली जाणार नाही.

बँकांनी कर्जे देताना, त्या कर्जामुळे चलनवाढीची तीव्रता वाढणार नाही ह्याची काळजी घ्यावी, परंतु उत्पादन आणि वितरण ह्यांना शक्य ते सर्व साहाय्य करावे असे बँकर्सना आवाहन करण्यात आले. एप्रिल, १९७२ अखेर बँकांनी रिझर्व्ह बँकेकडून घेतलेल्या कर्जाची रक्कम १९१ कोटी रुपयांवर जाऊ देऊ नये असेही त्यांना सांगण्यात आले.

---

## बँकांचे १९७० मधील नफे

६९ शेड्यूल्ड व्यापारी बँकांना १९७० मध्ये १९६९ च्या मानाने ८८ कोटी रु. अधिक उत्पन्न झाले; खर्च ८३ कोटी रु. अधिक झाला. एस्टॅब्लिशमेंट खर्चात २८% ने वाढ झाली, त्याचे कारण १९७० मध्ये २,१३७ नव्या शाखा उघडण्यात आल्या आणि स्टाफच्या मोबदल्यातही वाढ झाली. पुढील पृष्ठावरील तक्त्यात ६९ बँकांचे उत्पन्न, खर्च आणि नफा ह्यांचे तुलनात्मक आकडे देण्यात आले आहेत.

स्टेट बँक ऑफ इंडियाचे एकूण उत्पन्न २१ कोटी रु. नी वाढून १९७० मध्ये ते ११३ कोटी रु. झाले. त्याबरोबरच एस्टॅब्लिशमेंट खर्चात ११ कोटींची आणि दिलेल्या व्याजात ८.६ कोटींची वाढ झाली. स्टेट बँकेने १९७० मध्ये ४२५ नव्या शाखा उघडल्या; १९६९ मध्ये ८९ शाखा उघडल्या होत्या. स्टेट बँकेचा नफा १९६९ मध्ये ५.५० कोटी रु. होता तो १९७० मध्ये ५.४० कोटी रु. वर उतरला. स्टेट बँकेच्या उप-बँकांचा नफा ९२ लक्ष रु. वरून १.३० कोटी रुपयांवर गेला.

राष्ट्रीयीकृत १४ बँकांच्या उत्पन्नात ४९ कोटी रुपयांची भर पडून ते २१७ कोटी रुपयांवरून २६७ कोटी रुपयांवर गेले. १९६९ मध्ये उत्पन्नात २३ कोटी रुपयांची वाढ झाली होती. ठेवींच्या वाढीपेक्षा कर्जाची वाढ अधिक झाली. इंडियन बँकेचा कर्जपुरवठा १३.८% ने वाढला, तर युनियन बँकेचा कर्जपुरवठा ३८.१% ने वाढला. युनियन बँकेचे कर्जाचे ठेवीशी प्रमाण ६७.९% वरून ७७.५% वर गेले. सिंडिकेट बँकेचे कर्जाचे ठेवीशी प्रमाण सर्वांत जास्त म्हणजे ८५.०% होते. १४ राष्ट्रीयीकृत बँकांचा एकत्रित विचार केला, तर हे सरासरी प्रमाण १९७० मध्ये ७०.३% वरून ७५.०% वर गेले १२८५ नव्या शाखा उघडण्यात आल्यामुळे एस्टॅब्लिशमेंट खर्च खूपच वाढला. लहान लहान कर्ज-दारांच्या सोई पाहण्याचा खर्चही वाढला. १४ बँकांचा नफा ११.१ कोटी रु. वरून १२.८ कोटी रु. वर गेला. सेंट्रल बँक, अलाहाबाद बँक, इंडियन बँक आणि बँक ऑफ महाराष्ट्र ह्या बँकांचा नफा फारसा वाढला नाही; सेंट्रल बँकेचा नफा तर घटलाच.

---

## कच्च्या कापसाच्या आयातीसाठी १० कोटी रु.

इजिप्त आणि सुदान हे देश वगळून बाकीच्या देशांकडून एक लक्ष गासड्या कच्चा कापूस ( प्रत्येक गासडी : १८० कि. ग्रॅ. ) आयात करण्यासाठी १० कोटी रुपयांचे परदेशी चलन मध्यवर्ती सरकारने मोकळे केले आहे. त्यापैकी ५ कोटी रु. निर्गत करणाऱ्या गिरण्यांसाठी राखून ठेवले जातील. बाकीचे ५ कोटी रुपये कॉटन कॉर्पोरेशन १-३/१६" आणि त्यापेक्षा जास्त लांब धाग्याच्या कपाशीच्या आयातीसाठी उपयोगात आणील.

## ६९ बँकांचे उत्पन्न, खर्च आणि नफा

( आकडे कोटी रु. चे )

| | १९६८ | १९६९ | १९७० | वाढ | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | १९६८ पेक्षा १९६९ | १९६९ पेक्षा १९७० |
| १. एकूण उत्पन्न | ३९२·८२ | ४०५·४४ | ४९३·४३ | + ४२·६२ (१२) | + ८७·९९ (२२) |
| त्यापैकी व्याज आणि डिस्कौंट | २९३·१५ | ३२९·३४ | ४१२·०२ | + ३६·१९ (१२) | + ८२·६८ (२५) |
| २. एकूण खर्च | ३४२·६६ | ३८३·६९ | ४६७·१८ | + ४१·०३ (१२) | + ८३·४९ (२२) |
| त्यापैकी (अ) दिलेले व्याज | १६९·८१ | १८८·९७ | २२५·४४ | + १९·१६ (११) | + ३६·४७ (१९) |
| (ब) एस्टॅब्लिशमेंट खर्च | १२६·४८ | १३९·७० | १७८·१४ | + १३·२२ (११) | + ३८·४४ (२८) |
| ३. नफा | २०·१६ | २१·७५ | २६·२५ | + १·५९ (८) | + ४·५० (२१) |

[ कंसातील आकडे वाढीचे % दर्शवितात ]

## १४ राष्ट्रीयीकृत बँकांच्या ठेवीत, कर्जात, ठेवी-कर्जाचे प्रमाणात, नव्या शाखात आणि नफ्यात वाढ

( आकडे लक्ष रु. चे )

| बँक | १९६९ चे मानाने १९७० मध्ये वाढ % | | कर्जे-ठेवी प्रमाण % | | उघडलेल्या नव्या शाखा | | करानंतर पण बोनसपूर्व नफा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ठेवी | कर्जे | १९६९ | १९७० | १९६९ | १९७० | १९६९ | १९७० |
| १. अलाहाबाद बँक | ११·४ | १७·३ | ७०·४ | ७४·२ | ३७ | ४५ | ४० | ७३ |
| २. बँक ऑफ बरोडा | १६·९ | ३६·२ | ६७·१ | ७८·३ | ९८ | १०६ | १,२३ | १,४४ |
| ३. बँक ऑफ इंडिया | १४·० | २१·३ | ६९·८ | ७४·२ | ८४ | ९० | १,६१ | १,९९ |
| ४. बँक ऑफ महाराष्ट्र | १७·६ | २२·७ | ७१·७ | ७४·८ | २७ | ४७ | २६ | २८ |
| ५. कॅनरा बँक | २३·० | ३०·१ | ७४·१ | ७८·३ | ६६ | १३६ | ५५ | १,०३ |
| ६. सेंट्रल बँक ऑफ इंडिया | १३·७ | १७·८ | ७३·९ | ७६·५ | १६३ | २५२ | २,२५ | २,०८ |
| ७. देना बँक | १५·१ | २३·३ | ६३·७ | ६८·२ | ४५ | ९३ | ३१ | ५१ |
| ८. इंडियन बँक | ११·८ | १३·८ | ७५·७ | ७७·१ | २४ | ४१ | २० | २३ |
| ९. इंडियन ओव्हरसीज बँक | १६·४ | २०·६ | ६७·४ | ६९·९ | ३२ | ४३ | २६ | ३७ |
| १०. पंजाब नॅशनल बँक | १३·८ | १७·० | ६५·५ | ६७·४ | ८८ | ९१ | १,५९ | २,१४ |
| ११. सिंडिकेट बँक | २५·२ | २९·८ | ८२·० | ८५·० | १०१ | १०६ | ५० | ६५ |
| १२. युनियन बँक | २१·१ | ३८·१ | ६७·९ | ७७·५ | ६० | १०० | ४० | ४९ |
| १३. युनायटेड बँक ऑफ इंडिया | १७·८ | २०·० | ७४·० | ७५·४ | ३६ | ६५ | ५९ | ७३ |
| १४. युनायटेड कमर्शिअल बँक | १५·८ | २९·० | ६८·६ | ७६·४ | ५२ | ७० | ९० | १,४२ |
| एकूण | १५·९ | २३·५ | ७०·३ | ७५·० | ९१३ | १२८५ | ११,०५ | १३,७९ |

## भारताच्या न्याय्य भूमिकेचे १०० टक्के समर्थन

रशिआत निघणाऱ्या 'न्यू टाइम्स' ह्या राजकीय साप्ताहिकात बांगला देश प्रकरणी भारताने घेतलेल्या भूमिकेचा १०० टक्के पाठपुरावा करण्यात आला आहे. ह्यासंबंधी छापण्यात आलेल्या लेखात असे म्हटले आहे की बांगला देशातर्फे करण्यात येणारी स्वातंत्र्याची मागणी तेथे करण्यात आलेल्या अंधेरी दडपशाहीतून उगम पावलेली आहे. २५ मार्च ह्या दिवशी पाकिस्तानच्या लष्कराने लोकांवर निर्घृणपणे हत्यार उचलले. तोपर्यंत बांगला देशाचे नेते प्रांतिक स्वायत्तता मागण्यापलीकडे गेलेले नव्हते. अर्थातच तेथे आज जी परिस्थिती निर्माण झाली आहे ती सर्वस्वी पाकिस्तानने स्वतःच्या हातानी निर्माण केलेली आहे. आता तेथे सुमारे १ लाख गनीम निरनिराळ्या भागांत पाकिस्तानी लष्कराला सतावून सोडत आहेत. गनिमांच्या कारवाया निदान एक तृतीअंश बांगला देशात पसरलेल्या आहेत. ढाका आणि इतर अनेक शहरांत रोजच्या रोज आगी लागत आहेत आणि बाँबचे स्फोट होत आहेत. त्याचप्रमाणे देशातील मार्गावरील दळणवळण धोक्याचे व असुरक्षित झाले आहे. स्वतः निर्माण केलेल्या परिस्थितीवर वास्तववादी दृष्टिकोनातून योग्य राजकीय उपाय योजण्याचे मात्र टाळण्यात येत आहे. लष्करी बळावर प्रश्न सोडवू पाहण्यात येत आहे. भारतात येणाऱ्या निर्वासितांचा लोंढा अद्याप थांबलेला नाही. ह्यावरून तेथील अत्याचार अजून थांबलेले नाहीत हे उघड होते. पाकिस्तानने सरहद्दीवर लष्कर आणल्यामुळे भारताला स्वतःच्या रक्षणासाठी आपले लष्कर सरहद्दीवर आणावे लागले.

---

## देशी बनावटीची मिग - २१ जातीची विमाने

सुधारलेली अद्ययावत बनावटीची मिग - २१ जातीची लढाऊ विमाने पुढील वर्षाच्या अखेर अगर १९७३ च्या प्रारंभी भारतात तयार होऊ लागतील, आणि त्यासाठी लागणारे सर्व भाग भारतातच बनविलेले असतील. हिंदुस्थान एरोनॉटिक्स लि. ह्या कारखान्याच्या नासिकच्या विभागाने गेल्या वर्षी ऑक्टोबर मध्ये भारतात बनविलेले पहिले मिग– २१ विमान हवाई दलाला दिले. नासिक येथील कारखाना आता सुधारलेल्या विमानांच्या उत्पादनास सिद्ध झाला आहे. नव्याने तयार होणारे विमान अधिक सामर्थ्यवान असून त्याची स्वनातीत गती मात्र कायम राखण्यात आली आहे. पाकिस्तानच्या विमान दलात फ्रेंच बनावटीची १११-इ ह्या जातीची विमाने आहेत. त्या विमानांच्या तोडीची ही विमाने असतील असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. नासिक येथील कारखान्यात प्रथम रशियातून आयात केलेले भाग जुळवून विमानांचे उत्पादन करण्यात येत असे. आता मात्र ७० हजारांपेक्षाही अधिक लागणारे भाग तेथेच तयार करण्यात येत आहेत. पण अजूनही त्यासाठी लागणारा कच्चा माल आयात करावा लागतो. हळूहळू कच्चा मालही भारतामधील वापरण्यात येऊ लागेल. विमाने बनविण्यासाठी लागणारा खास प्रकारचा अल्युमिनमचा पत्रा अद्यापि आयात करावा लागतो. मध्य प्रदेशातील कोर्बा येथील अल्युमिनमचा कारखाना सुरू झाला की हे परावलंबन संपेल. इतर महत्त्वाच्या भागांसाठी लागणारा कच्चा मालही देशातच मिळविण्याचे प्रयत्न कसोशीने करण्यात येत आहेत.

---

## नायलॉनच्या धाग्याचा अपुरा पुरवठा

अमृतसर येथील, नॅायलॉनचे धागे वापरून कापड बनविणाऱ्या गिरण्यांना अपुऱ्या साठ्याला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे अनेक गिरण्यांना आपल्या उत्पादनात बरीच कपात करावी लागली आहे. भारत–पाकिस्तान सरहद्दीवर सध्या तंग वातावरण असल्याने स्थानिक गिरण्यांच्या धाग्यांच्या पुरवठ्यात खूपच कपात करण्यात आली असून बाजारपेठेतील व्यवहारही जवळजवळ थंडावले आहेत. धाग्याच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे ३० टक्के गिरण्या बंद ठेवण्यात आल्या आहेत आणि बाकीच्या आपल्या उत्पादनक्षमतेपैकी थोडीच क्षमता वापरत आहेत. ह्या धंद्यात गुंतलेल्या जवळजवळ सर्व गिरण्या छोट्या उद्योगधंद्यांत मोडणाऱ्या आहेत. अमृतसर व त्याच्या आसपासचा परिसर हा हिंद-पाकिस्तान सरहद्दीजवळ असल्याने नायलानचा धागा बनविणारे उत्पादक त्या भागात आपला माल पाठविण्यास नाखूष होत चालले आहेत. अर्थातच धाग्याचा पुरवठा हळूहळू कमी होत चालला आहे. शिवाय धागा वापरणाऱ्यांना आणखी एका अडचणीला तोंड द्यावे लागत आहे. बाजारात पतीवर माल मिळेनासा झाला आहे. धाग्याचा व्यापार करणाऱ्या अनेक व्यापाऱ्यांनी तो तयार करणारापासून घेऊन वापरणाराकडे पोचविण्याचे बंद केले आहे. त्यांचे लक्ष झालेल्या व्यवहारातील पैसे वसूल करण्याकडे लागलेले आहे. नवीन व्यवहार करण्यास ते तयार नाहीत. धाग्याचे उत्पादकही आगाऊ पैशाची मागणी करीत आहेत. दरम्यान बाजारातील शिलकी साठा संपत असून त्यात नवीन भर पडणे थांबले आहे.

---

## सोन्याची अंडी घालणाऱ्या कोंबड्या अर्थमंत्र्यांना हव्याच आहेत

"कर्जाचा बोजा उद्योगधंद्यांना मारक होत आहे" अशी उद्योगपतींची जी तक्रार आहे, ती खोटी असल्याचे कायदा मंत्री श्री. एच. आर. गोखले ह्यांनी म्हटले आहे. एका सुप्रसिद्ध व्यंग्यचित्रकाराने आपल्या व्यंग्यचित्रात सोनेरी अंडी घालणाऱ्या कोंबडीस ठार करण्यास अर्थखाते कुऱ्हाड घेऊन निघाले असल्याचे चित्रित केले आहे, परंतु अर्थमंत्र्यांचा हा उद्देश खासच नसल्याची त्यांनी ग्वाही दिली. अधिक उत्पादनाच्या स्वरूपात कोंबडीने अधिकाधिक अंडी द्यावीत, त्यासाठी नव्या उद्योगांच्या स्वरूपात कोंबड्यांची संख्या वाढावी, परंतु ह्या कोंबड्यांची सोनेरी अंडी मुख्यतः सामान्य जनांसाठी उपलब्ध व्हावी, कोंबड्यांच्या मालकांनीच त्यांचा उपभोग घेऊ नये, असे दूरदृष्टीच्या अर्थमंत्र्यांचे धोरण आहे.

## सर्व दस्तांवर ( चेक वगळून ) १० पैसे जादा स्टँप ड्यूटीचे तिकीट लावले पाहिजे

१९७१ च्या १६ नंवरच्या ऑर्डिनन्सने खाली सांगितलेल्या सर्व प्रकारच्या दस्तांवर ( चेक्स वगळून ) १० पैसे जादा स्टप ड्यूटी बसविली आहे. भारताच्या घटनेच्या ७ व्या परिशिष्टा-मधील १ ल्या विषयसंचातील ९१ व्या कलमात समाविष्ट असलेल्या, स्टँप ड्यूटीस पात्र अशा सर्व दस्तांना हा ऑर्डिनन्स लागू आहे. ह्याचा अर्थ, खालील दस्तांवर १० पैसे जादा स्टँप ड्यूटीचे तिकीट १५–११–१९७१ पासून लावावयाचे आहे.

( १ ) बिल्स ऑफ एक्सचेंज ( २ ) प्रॉमिसरी नोटा ( ३ ) बिल्स ऑफ लेडिंग ( ४ ) लेटर्स ऑफ क्रेडिट ( ५ ) विमा पॉलिसी ( ६ ) शेअर ट्रॅन्स्फर ( ७ ) प्रॉक्झी ( ८ ) पावत्या आणि ( ९ ) डिबेंचर्स.

ह्या जादा स्टँप ड्यूटीच्या स्टँपवर "रेफ्युजी रिलीफ" असे शब्द छापलेले असतील आणि ती पोस्ट ऑफिसात किंवा स्टँप ऑफिसात मिळतील.

ज्या दस्तांवर १५ नोव्हेंबरनंतर पूर्वीच्या स्टँप ड्यूटीवरच सही शिक्के होऊन गेले असतील, त्यांच्या जागी नवे दस्त करून घ्यावे लागतील किंवा जादा स्टँप ड्यूटीचे त्यावर तिकीट लावून ते सही करणारांकडून कॅन्सल करून घ्यावे लागेल.

---

## घड्याळांचा आणखी एक कारखाना

रशिआच्या मदतीने पश्चिम बंगालमध्ये घड्याळे तयार करण्याचा एक कारखाना उभारण्यात येणार आहे. पुढील वर्षाच्या प्रारंभी कारखाना उत्पादनास सुरुवात करील आणि सुमारे २० हजार घड्याळे तयार करील असा अंदाज आहे. पहिल्या वर्षाच्या उत्पादनात ५० टक्के भाग देशी बनावटीचे असतील. पश्चिम बंगाल सरकारच्या ग्रामोद्योग व छोटे कारखाने विभागातर्फे कारखाना पुरस्कृत करण्यात आलेला आहे. १९७६ च्या सुमारास त्यात दरसाल ८० हजार घड्याळे तयार होऊ लागतील. त्यावेळी त्यातील ८५ टक्के भाग देशात तयार झालेले वापरण्यात येतील. १९७३ साली ५० हजार घड्याळांच्या उत्पादनाचे लक्ष्य ठरविण्यात आलेले आहे. प्रत्येक वर्षी घड्याळात वापरण्यात येणाऱ्या आयात केलेल्या भागांचे प्रमाण कमी कमी होत जाईल. कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री आयात करण्यासाठी एका कारखानदाराला परवाना देण्यात आला आहे. कारखान्याच्या यंत्रसामग्रीची पाहणी करून ती आयात करण्यासाठी त्यांचे प्रतिनिधी मॉस्कोला रवाना झाले आहेत. प्रारंभी उत्पादनाच्या प्राथमिक अवस्थेसाठी लागणारी यंत्रसामग्री आणण्यात येईल. कारखाना सुरू झाल्यावर तेथे रोजगारी मिळणाऱ्या कामगारांची संख्या हळूहळू वाढून १९७६ च्या सुमारास ५०० कामगार तेथे काम करू लागतील. सध्या देशात फ्रेंच व जपानी कारखानदारांच्या सहकार्याने घड्याळे निर्माण करण्यात येतात. परंतु त्यांची संख्या दरसाल १ लाखापेक्षा अधिक नाही.

## प्राप्तिकर वसूल करण्याचे प्रयत्न

प्राप्तिकराची थकबाकी वसूल करण्याचे प्रयत्न सरकार करीत असून गेल्या काही वर्षांत ते काहीसे यशस्वी झाले आहेत. १९७०-७१ साली प्राप्तिकराच्या थकबाकीपैकी १६० कोटी रुपये वसूल करण्यात आले. १९६८-६९ साली ११० कोटी रुपये आणि १९६७-६८ साली १०० कोटी रुपये अशी थकबाकी वसूल करण्यात आली होती. तरी सुद्धा एकूण थकबाकीत फार मोठी घट झालेली मात्र दिसून येत नाही. १९६९-७० साल अखेर ५०७ कोटी रुपयांची थकबाकी वसूल व्हावयाची होती. १९७०-७१ साल अखेर थकबाकीची रक्कम ५०० कोटी रुपये होती. जुनी थकबाकी वसूल करण्यात फारसे यश आले असे ह्यावरून म्हणता येणार नाही. प्राप्तिकर खात्याची यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्याच्या सूचना करण्यात येत आहेत.

---

## लोकरीच्या कपड्यांची रशिआला निर्यात

सोव्हिएट रशिआ भारताकडून १० कोटी रुपये किमतीचे लोकरीच्या धाग्याचे विणलेले कपडे विकत घेण्याची शक्यता आहे. रशिआतील व्यापारी संघटनेचे एक मंडळ सध्या लुधिआनाला आलेले असून तेथील स्थानिक गिरण्यांशी ते वाटाघाटी करीत आहे. रशिअन मंडळाने अनेक प्रकारच्या मालाची पाहणी केली आहे. मालाची बनावट अधिक सुबक असावी अशा सूचना त्याने गिरणीच्या मालकांना केल्या आहेत. वाटाघाटी यशस्वी झाल्या तर रशिअन मंडळ लवकरच मालाची मागणी नोंदवून परतेल. उभयता देशातील व्यापारी कराराप्रमाणे लुधिआना येथील लोकरीच्या गिरण्यांकडून रशिआने दरसाल १० कोटी रुपयांचा माल घ्यावयाचा आहे.

---

## मुंबईकरांना वर्षभर स्वस्त सफरचंदे मिळणार

६,००० टन ( ३,००,००० खोकी ) सफरचंदे ठेवता येतील एवढे कोल्ड स्टोरेज मुंबईत उभारण्यात येत आहे. त्यामुळे वर्ष-भर सफरचंदे मिळू शकतील. मोसमात ४ रु. किलो आणि इतर वेळी ६ रु. किलो ह्या दराने चांगली सफरचंदे मुंबईकरांना खावयास मिळतील. कोल्ड स्टोरेजपैकी २,००० टनांचा भाग सप्टेंबर, १९७२ अखेर पुरा होईल आणि बाकीचा पुढील पाच वर्षांत तयार होईल. हिमाचल प्रदेशातून येणाऱ्या सफरचंदांना वर्षभर बाजारपेठ मिळेल.

---

## हवाई सुंदरींनी वजन आटोक्यात ठेवले पाहिजे

ऑलिंपिक एअरलाइन्स ह्या ग्रीक विमानवाहतुक कंपनीने दोन हवाई सुंदरींना ( एअर होस्टेसेसना ) एक महिनाभर घरी बसवून वजन कमी करण्यास सांगितले. हवाई सुंदरींच्या यूनियनने हा प्रश्न कोर्टात नेला, तेव्हा "स्वतःचे शरीर आकर्षक राखण्यासाठी हवाई सुंदरींना सडपातळ राहाण्यास सांगण्याचा कंपनीला अधिकार आहे" असा कोर्टाने निवाडा केला.

### गंगा-कावेरी कालव्यासंबंधी संयुक्त राष्ट्र संघटनेचा सल्ला

हिंद सरकारचे पाणीपुरवठा व वीजमंत्री श्री. के. एल. राव ह्यांनी असे सांगितले आहे की भारतामधील मोठ्या नद्या कालव्यांच्या साहाय्याने जोडण्याबाबत संयुक्त राष्ट्र संघटनेच्या तज्ज्ञांचा सल्ला घेण्यात येणार आहे. ते म्हणाले की अमेरिका आणि रशिया ह्या देशांतील तज्ज्ञांना ह्या कामासंबंधी अनुभव आहे. म्हणून त्यांचा सल्ला उपयुक्त ठरणार आहे. परंतु ह्या देशांतील तज्ज्ञांना भारतात आणणे काहीसे कठीण आहे. तरी पण लवकरच ते भारतात येण्याची शक्यता आहे. मध्यवर्ती पाणी आणि वीज मंडळाने मोठ्या नद्यांना जोडण्याच्या प्रकल्पाची प्राथमिक पाहणी केलेली आहे. त्यावरून असे दिसून आले आहे की गंगा नदीचे पाणी काही प्रमाणात वळविता येणे शक्य आहे. काही ठिकाणी पाणी पंपांच्या साहाय्याने उपसावे लागेल तर काही ठिकाणी कालवे खोदून ते वळविता येईल. काही ठिकाणी नैसर्गिक नद्या-नाल्यांचाही उपयोग करता येईल. देशातील उपलब्ध पाण्याचा एकत्र विचार करून त्याचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत ह्याबद्दल वाद नाही. परंतु ह्या प्रश्नाच्या केवळ तांत्रिक बाजूचाच विचार करून भागण्यासारखे नाही. त्याच्या आर्थिक बाजूचाही विचार झाला पाहिजे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या तज्ज्ञ समितीला हिंदमधील मोठ्या नद्या जोडण्याची योजना योग्य वाटली तरी तिची तपासणी व पाहणी करण्याच्या कामाला १० वर्षे लागतील. त्यानंतर प्रत्यक्ष काम सुरू करण्याचा प्रश्न पुढे येईल. काम सुरू झाल्यावर ते पूर्ण होण्यास २० वर्षांचा अवधी लागेल असा अंदाज आहे.

### नाणी वितळविणे आणि साठविणे गुन्हा

दुय्यम नाणी वितळविणे आणि ती वितळविण्याच्या दृष्टीने साठविणे गुन्हा ठरविणारे बिल लोकसभेत मांडण्यात आले आहे. गेल्या महिन्यात काढलेल्या वटहुकमाची जागा हा नवा कायदा घेईल.

### टोकिओ : सर्वांत जास्त लोकवस्तीचे शहर

जगातील सर्वांत जास्त लोकवस्तीचे शहर बनण्याचा मान टोकिओ शहराने मिळविला आहे. त्याची लोकसंख्या ९०,०५,००० झाली आहे. टोकिओच्या खालोखाल न्यूयॉर्क (७७,९८,७५७), लंडन (७७,०३,४००), मॉस्को (६९,४२,०००) आणि शांघाई (६९,००,०००) असा अनुक्रम लागतो.

### रेल्वेज्चे उत्पन्न वाढले; खर्च जास्तच वाढला

चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत रेल्वेज्चे अंदाजापेक्षा ७ कोटी रुपये उत्पन्न अधिक झाले आणि अंदाजापेक्षा २४ कोटी रुपये खर्च जास्त झाला.

### चोरीच्या फौजदारी खटल्यामुळे नफाच झाला

मिसेस निर्मला चौहान ह्या ३४ वर्षांच्या, तीन मुलांच्या हिंदी स्त्रीवर लंडनमधील कोर्टात दुकानातून १७ रुपयांचे वाणसामान चोरल्याबद्दल फौजदारी खटला भरण्यात आला होता. तिला नीट इंग्रजी येत नसल्यामुळे तिचा दुभाषा म्हणून काम करण्याची तयारी तिच्या नवऱ्याने कोर्टाला दाखविली. दुकानदाराला ९ रु. नुकसानभरपाई दाखल देण्याचा कोर्टाने मिसेस चौहानला हुकूम केला. तिच्या नवऱ्याला कोर्टाच्या कचेरीतून दुभाषाचे काम केल्याबद्दल १२० रु. सरकारी भत्ता मिळाला. अशा रीतीने, त्यांचा १२०रु. वजा ९ रु. म्हणजे १११ रु. नफाच झाला.

### रत्नाकर बँकेची गिरगाव-मुंबई शाखा

दि रत्नाकर बँक लि. च्या गिरगाव-मुंबई शाखेचे उद्‌घाटन बुधवार दि. २४ नोव्हेंबर रोजी पद्मभूषण श्री. वसंतरावदादा पाटील ह्यांच्या शुभ हस्ते माननीय श्रीमान साहू श्रेयांस प्रसाद जैन ह्यांच्या अध्यक्षतेखाली झाले. स्वागतसमारंभ सकाळी १० ते दुपारी १ आणि सायंकाळी ४ ते ६ होता. मुंबई शाखेचे मॅनेजर श्री. एस. एन. शहा हे असून शाखा-ठिकाण हुतुंग बिल्डिंग, डॉ. भालेराव मार्ग, केळेवाडी, गिरगाव, मुंबई ४, हे आहे.

### रशिआची अमेरिकन गव्हाची खरेदी

अमेरिका आणि रशिया ह्यांचेमध्ये नुकत्याच झालेल्या कराराप्रमाणे रशिया अमेरिकेकडून ९३·७५ कोटी रुपयांचे २९ लक्ष टन अन्नधान्य खरीदणार आहे.

### डिझेल एंजिनांच्या मंदीचा कूपरवर परिणाम

कूपर एंजिनिअरिंग कंपनीने जूनअखेर संपलेल्या वर्षी २·५३ कोटी रुपयांची डिझेल इंजिने व सुटे भाग ह्यांची विक्री केली. गेल्या वर्षी ३·९० कोटी रुपयांची विक्री केली होती. म्हणजे, विक्रीत ३५% घट झाली.

### टेलिफोनचा नंबर उच्चारा : तो जोडला जाईल

आपणास हव्या असलेल्या टेलिफोनचा नंबर मिळविण्यासाठी सध्या तबकडी बोटाने फिरवावी लागते. त्याऐवजी, टेलिफोनचा नंबर नुसता उच्चारला की हवा तो नंबर आपोआप जोडला जावा, ह्या दिशेने कित्येक प्रगत देशांत संशोधन चालू आहे.

### रेल्वेजचे चोऱ्यांमुळे नुकसान

रेल्वेने पाठविलेल्या मालापैकी चोरीला गेलेल्या मालामुळे रेल्वेजचे १९७०-७१ मध्ये ५४२·५१ लक्ष रुपयांचे नुकसान झाले. ह्याच मुदतीत रेल्वेजचे स्वतःच्या चोऱ्यांमुळे ५२·३२ लक्ष रुपयांचे नुकसान झाले.

### मध्यावधी निवडणुकीचा खर्च

लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीसाठी सरकारला ९,५६,२०,४१७ रु. ६८ पैसे खर्च आला.

### माणसातून उठवलेल्या प्रॉफ्युमोचे माणसात पुनरागमन

१९६३ साली त्या वेळचा ग्रेटब्रिटनचा युद्धमंत्री जॉन प्रॉफ्युमो ह्याच्या अनैतिक संबंधामुळे वादळ निर्माण होऊन त्याला मंत्रिपद सोडावे लागले होते. त्याला समाजाने वहिष्कृत केले होते. १५ दिवसांपूर्वी राणी एलिझाबेथने त्याच्याशी सस्मित हस्तांदोलन करून, "आपल्या भेटीमुळे मला आनंद वाटला" असे म्हटले आणि पूर्वीच्या कटुतेवर पडदा पडला. निशाबाज लोकांच्या पुनर्वसनासाठी प्रॉफ्युमो गेली ७ वर्षे स्वयंस्फूर्तीने काम करीत आहे. मुख्यतः त्याच्याच प्रयत्नाने ४० लक्ष रुपयांची एक इमारत ह्या कामासाठी उभारण्यात आली, तिचे उद्घाटन राणीने केले. ह्या प्रसंगी पंतप्रधान एडवर्ड हीथ, चर्चिलची विधवा लेडी स्पेन्सर चर्चिल, इत्यादींनीही जॉन प्रॉफ्युमाशी हस्तांदोलन करून त्याचे अभिनंदन केले. अशा रीतीने तो पुनः माणसात आला.

---

### १७ रु. बँकेत शिल्लक पण चेक दिला १,५२५ रुपयांचा

मिसेस लिली आयझॅक मोझेस ह्या बाईनी मुंबईमधील एका दुकानातून सुमारे ४०० रु. च्या सहा साड्या विकत घेतल्या. पश्चिम जर्मनीला पाठविण्यासाठी आपल्याला एकूण ३२ साड्या घ्यावयाच्या आहेत, असे तिने दुकानदाराला सांगितले. तिने त्याला १,५२५ रुपयांचा चेक दिला आणि बाकीच्या साड्या उद्या घेऊन जाईन असे सांगितले. दुकानदार चेक वटविण्यासाठी गेला, तेव्हा त्याला सर्व प्रकार समजला. मिसेस मोझेसला मॅजिस्ट्रेटपुढे उभे करण्यात आले.

---

### बांगला निर्वासितांची संख्या ५८ देशांच्या लोकसंख्येपेक्षा मोठी

बांगला देशातून भारतात आलेल्या निर्वासितांच्या संख्येचा ताजा आकडा ९७,९६,०७६ एवढा प्रचंड आहे. युनायटेड नेशन्सच्या सभासदांपैकी किमान ५८ देशांच्या लोकसंख्येपेक्षा ही संख्या मोठी आहे. त्या ५८ देशांतील लोकसंख्या ज्या गतीने वाढत आहे, त्यापेक्षा जास्त गतीने ह्या निर्वासितांच्या संख्येत भर पडत आहे.

---

### तांब्याच्या सलकड्यांमुळे रोगपरिहार

मद्रासमध्ये तांब्याच्या सलकड्या घालणे हा औषधी उपाय समजला जाऊ लागला आहे. ह्या सलकड्या घातल्यावर बरे वाटू लागते आणि त्या काढून टाकल्या की पुनः रोग उद्भवतो असा कित्येकांचा अनुभव आहे. शरीरातील स्टॅटिक विजेमुळे संधिवाता सारखे विकार होतात अशी कल्पना आहे. तांब्यातून वीज लवकर वाहू शकते आणि त्याच्या सान्निध्यामुळे शरीरातील विजेचा प्रभाव नष्ट होतो, असे कारण सांगितले जात आहे.

---



ओगले
प्रभाकर कंदील

◆ अंधाऱ्या रात्री,
◆ वादळी वाऱ्यात,
◆ ओबड-धोबड रस्त्यावर,
◆ खवळलेल्या दर्यावर

मार्गदर्शक व विश्वसनीय.

तयार करणार
ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड
ओगलेवाडी ( जि. सातारा )



चवदार पिठासाठी
पिठाच्या चक्क्या

•बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
•मजबूत बांधणी
•अद्यावत् यंत्र योजना
•साईज १४", १६", १८"
फोन नं. १६९
उत्पादक–
भिडे अँन्ड सन्स प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य.

## एजंटामार्फत जाहिराती काय म्हणून ?

"सरकारी खाती स्वतःच्या प्रकाशनासाठी जाहिरात-एजंटामार्फत जाहिराती का घेते?" असा सवाल पब्लिक अकौंटस् कमिटीने केला आहे. टेलिफोन डिरेक्टरीत सरकारी आणि पब्लिक सेक्टरमधील कंपन्यांच्या जाहिराती छापण्यात येतात, त्यांना जाहिरात-एजन्सीचा दलाल का लागावा? प्रत्यक्ष जाहिरात देणारांकडूनच जाहिराती घेतल्या तर अप्रस्तुत पद्धतींना वाव मिळेल आणि ह्यासाठी नोकरवर्गही निष्कारण नेमावा लागेल, असे पोस्ट-तार खात्याचे म्हणणे आहे. एक झोनल रेल्वे स्वतःच्या टाइम-टेबलासाठी प्रत्यक्ष जाहिरातदारांकडून जाहिराती घेते; एजंटाचा उपयोग करीत नाही, असे प. अ. कमिटीने दाखवून दिले आहे.

## मासिक उत्पन्न २ हजारांपेक्षा ज्यास्त असणार नाही

प्रायव्हेट सेक्टरमधील अधिकाऱ्यांच्या पगारावर कमाल मर्यादा नियंत्रण घालण्याचे सिलोन सरकारने ठरविले आहे. कुणालाही २,००० रुपयांपेक्षा जास्त निवळ दरमहा प्राप्ती मिळू शकणार नाही. व्यक्तीचा प्राप्ती कर, संपत्ती कर, सक्तीची बचत, इत्यादी वगळल्यावर २,००० रु. पेक्षा जास्त प्राप्ती राहता कामा नये. कंपनीचे डायरेक्टर आणि वरिष्ठ अधिकारी ह्यांना मिळणाऱ्या भरमसाट उत्पन्नावर सिलोनच्या अर्थमंत्र्यांचा रोष आहे.

## जवानांसाठी रम-व्हिस्कीच्या ६०,००० बाटल्या

राजस्तान सरकारने पश्चिम आघाडीवरील जवानांना एक्साइज-ड्यूटीमुक्त ५०,००० रमच्या आणि १०,००० व्हिस्कीच्या बाटल्या देण्याचे ठरविले आहे.

## मोठ्या कंपन्यांच्या मालाच्या किमतींच्या वाढीस पायबंद

ज्या कंपन्यांचा वार्षिक खप ८० कोटी रु. पेक्षा जास्त आहे अशांना किंमती वाढविण्यास आणि ५,००० पेक्षा जास्त कामगार असणाऱ्या कंपन्यांना वेतनवाढ करण्यास सरकारची आगाऊ परवानगी घ्यावी लागेल, असे अमेरिकन सरकारने जाहीर केले आहे. ८० कोटी रु. पेक्षा जास्त वार्षिक खप असलेल्या १,३०० कंपन्या अमेरिकेत आहेत.

## संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करणारांना शिक्षेच्या मुदतीत कपात

तामीळनाडूमधील जे कैदी तुरुंगवासात असताना संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करून घेतील, त्यांना १५ दिवसांपासून १ वर्षापर्यंत शिक्षेची माफी मिळणार आहे. २१ वर्षांवरील आणि ५५ वर्षांखालील कैद्यांना ह्या सवलतीचा फायदा मिळू शकेल. ६ महिने शिक्षा : १५ दिवस, ६ महिने ते १ वर्ष शिक्षा : १ महिना, १ वर्ष ते ३ वर्षे शिक्षा : ३ महिने, ३ वर्षे ते १० वर्षे शिक्षा : ६ महिने आणि १० वर्षांपेक्षा जास्त शिक्षा : १ वर्ष अशी माफी मिळेल.


**THE BELGAUM BANK LIMITED**

**Estd. 1930**

SCHEDULED BANK

*Regd. Office* : 659-60, Raviwar Peth, Belgaum


**Working Funds : Over Rs. 7 Crores**

**Share Capital & Reserves : Over Rs. 17 Lacs**

40 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major Number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lockers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

S. Y. KAMAT — *General Manager.*

K. B. KIRTIKAR — *Chairman.*



**GADRE BROTHERS**

**ENGINEERS & FOUNDERS**

MADHAVNAGAR [S. Rly.]

Phone: 318 Sangli

Gram : 'SEWA Madhavnagar

# सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहांत केलेले स्मारक.


♣


फोन नं. :- ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

स्थापना १९१९
माकडछाप
म्हणजेच
काळी टूथपावडर
नोगी आणि कंपनी प्रा. ली.
मुंबई ६९ ओ आर

सोल सेलींग अेजन्टस्
## नोगी सेल्स् कॉर्पोरेशन
२७७ जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई ४. पी आर.

MARATHI





इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—
## न्यू विजय इंडस्ट्रीज लि.
विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

फोन : २३२
तार : Vijayplow


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )